सकाळ 06/08/2016

# धूतपापेश्वरात 'धृपद' स्वराभिषेक

## आसमंत, मित्रमेळातर्फे १५ ऑगस्टला आयोजन

रत्नागिरी, ता. ५ : निसर्गाची मुक्त उधळण असलेल्या राजापुरातील श्री देव धूतपापेश्वर मंदिरात श्रावणी सोमवार आणि श्रावण सरींचा मिलाफ साधत 'धृपद' मैफल रंगणार आहे. धृपद गायनाची निर्मिती भगवान शंकराची मानली जाते. आघाडीचे गायक पं. उदय भवाळकर यांची दमदार गायकी व जोडीला पखवाजाची घुमारदार साथ मिळणार आहे. हा स्वराभिषेकाचा योग येथील आसमंत बेनेवोलन्स फाउंडेशन आणि राजापुरातील मित्रमेळा संस्थेने जुळवून आणला आहे.



**उदय भवाळकर**

१५ ऑगस्टला श्रावणी सोमवारी सकाळी १०.३० वाजता श्री देव धूतपापेश्वर देवस्थान सभामंडपात मैफल रंगणार आहे. या कार्यक्रमाचा नितांत सुंदर अनुभव संगीतप्रेमींना घेता येणार आहे. श्रावण सरींनी सजलेला रंगमंच आणि डोंगर कपारीतील हिरव्यागार वनराईने नटलेले नेपथ्य असे प्रसन्न वातावरण आहे. या वातावरणात शिवशंभो व शेजारीच कोसळणाऱ्या प्रपातातून निनादणाऱ्या भैरवाच्या सुरांची पूजा.

हे वर्णन वाचतानाच नकळत डोळ्यासमोर उभं राहतं राजापूरचे आराध्य दैवत धूतपापेश्वर. मैफलीसाठी प्रवेश विनामूल्य आहे.

या अनोख्या मैफलीचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन आसमंतचे अध्यक्ष नंदकुमार पटवर्धन व मित्रमेळाने केले आहे.